# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 15/01/2024 (सोमवार) सायंकाळ

---

## शासकीय कामात अडथळा करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

**पो.स्टे. रामटेक :–** अंतर्गत १० किमी अंतरावर घोटीटोक शिवार रामटेक येथे दिनांक १४/०१/२०२४ ते ११.१५ वा. ते दिनांक १४/०१/२०२४ चे ११.३० वा. दरम्यान फिर्यादी व उपविभागीय अधिकारी रामटेंक विभाग रामटेक हे गौधखनिज अवैध वाहतुक होत असल्याचे माहिती मिळाल्यावरून रामटेक ते तुमसर मार्गाने पेट्रोलींग करीत असताना घोटीटोक येथे एक संशयति टिप्पर क्र. MH-40-AK-4158 यांना थांबण्याचा इशारा केला असता सदरचे वाहन चालकाने त्यांचेकडे मुद्दाम दुर्लश करून वाहनाचा अधिक वेग वाढवुन अरोली मार्गाने पळुन जावु लागल्याने यातील फिर्यादी व उपविभागीय अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांचेसह पथकाने त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या सोबत असलेले नॅनो कार क्र. MH-49-B-6616 हा चालक व त्याचा साथीदार टिप्पर चालकाला सांगितले की, गाडी थांबवु नको व फिर्यादी व त्यांच्या स्टाफ त्यांच्या ताफ्याच्या मध्ये येवुन अडवणुक करीत होता. त्यांनंतर फिर्यादीने गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीचे अंगावर नॅनो कार घालुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

दि .१४/०१/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक अप. क्र. ३३/२४ कलम ३०७ ,३५३ ,२८३, ३४ भादंवि सहकलंम १८४ मोवाका अन्वये स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हयाचे समांतर तपासा दरम्यान गुन्हयातील आरोपीचा शोध घेवून आरोपीतास आमडी पुलिया जवळुन ताब्यात घेऊन गुन्हयातील टिप्पर, कागदपत्रे, व आरोपी नामे– १) MH-40/AK – 4158 चा चालक जागेश्वर हरिराम यादव, वय ३५ वर्ष रा. पारडी नागपूर २) मोनू कादर खान वय ३४ वर्ष रा खरबी नागपूर ३) विष्णू चंद्रप्रकाश मिश्रा वय ३३ वर्ष रा खरबी नागपूर यांना पुढील तपास प्रक्रियेकरिता पोलीस स्टेशन रामटेक यांच्या ताब्यात देण्यात आले.

यावरून सदर प्रकरणी सरतर्फे भोजराज शंकर बडवाईक, वय ५१ वर्ष, रा. छोरिया ले आउट शितलवाडी ता. रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५३, ३०७, २८३, ३४ भादंवि सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान महेश भटकर सा. (कन्हान), तसेच पोलीस निरीक्षक ह्रदयनारायण यादव यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के पोस्टे रामटेक मो. नं ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

सदरची कारवाई ही सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक सा. नागपूर ग्रामीण श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोहवा रोशन काळे, उमेश फुलबेल, शंकर मडावी , नितेश पिपरोदे, प्रमोद भोयर, विरेंद्र नरड, विपीन गायधने यांनी पार पाडली.

## घरफोडी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत वार्ड क्र. ४ वाकीपुरा पाटणसावंगी सावनेर येथे दिनांक १४/०१/२०२४ चे ०३.४५ वा. ते ०४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विनोद रामकृ  णाजी डाखोळे वय ४५ वर्षे रा. वार्ड क्र. ४ वाकीपुरा पाटणसावंगी सावनेर हे आपल्या घरी झोपले असता घरफोडी करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या घराचा दरवाजा धकवून घरात प्रवेश करून घरफोडी करण्याचा प्रयत्न केला तसेच **आरोपी नामे—१)आकाश विलास लांजेवार रा रामकृष्ण अपार्टमेंट जवळ कुंभार टोला नंदनवन नागपूर, २) सुरज उर्फ मकवा संजय कोहळे रा जुना बगडगंज कुंभार टोली नंदनवन नागपूर** यांचे जवळ असलेल्या हुडाई कंपनीच्या कार क्र. एम. एच. —०२/सि.बी.—९७२५ जुनी वापरती किंमती १०००००/— रू ची झडती घेतली असता त्यामध्ये घरफोडीचे साहीत्य, तलवार व कारसह मिळून आल्याने आरोपीतांकडुन मुद्देमाल जप्त करून व आरोपीतांना ताब्यात घेतले वरील दोन्ही आरोपीतांविरूद्ध पोस्टे ला गुन्हा दाखल करून तपासात घेतला

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५८, ३८०, ५११, ३४ भांदवि, सहकलम ४, २५ शस्त्र अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली असुन सदर घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक दोनोडे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दोनोडे, मो. नं. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत वानखेडे लॉनचे मागे वार्ड क्र. ०८ सावनेर येथे दिनांक १३/०१/२०२४ चे १८.०० वा. ते दिनांक १४/०१/२०२४ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— उदयसींग हिरालाल परमार, वय ६८ वर्ष, रा. मुरलीधर देवस्थान, सावनेर हे आपल्या घरी नसतांना घरफोडी करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या घराच्या दरवाजाचे कुलुप तोडुन घरातील सामान अस्ताव्यस्त फेकुन अंगनात कंपाउंड वॉलचे आत ठेवलेली मोटरसायकल क्र. एम. एच.— ४०/ एएन— ११८९ जुनी अंदाजे किंमती २०,०००/— रु. ची कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक दोनोडे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दोनोडे, मो. नं. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर